दिनांक ३०/१०/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक खंडु महादेव मोरे, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस ठाणे विरगाव, औरंगाबाद ग्रामीण यांनी २०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | खंडु महादेव मोरे, वय ४९ वर्ष, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस ठाणे विरगाव, औरंगाबाद ग्रामीण<br>रा. वैजापुर, जिल्हा औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे विरगाव, ता. वैजापुर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | २०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचा दारुचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | मौजे वैजापुर - गंगापुर रोडवर भगुर फाट्या जवळील दोस्ती हॉटेल समोर |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचा दारुचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी खंडु मोरे, पोलीस हवालदार, नेमणुक पोलीस ठाणे विरगाव, औरंगाबाद ग्रामीण हे २०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, खंडु मोरे यांनी तक्रारदार यांच्याकडे २०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दिनांक ३०/१०/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, खंडु महादेव मोरे, वय ४९ वर्ष, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस ठाणे विरगाव, औरंगाबाद ग्रामीण यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन २०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे विरगाव, ता. वैजापुर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना पोना विजय बाम्हंदे, पोशि किशोर म्हस्के, केवल घुसिंगे, चालक देवसिंग ठाकूर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**